**कलम ४ (१) (ब) (i)**

**मुंबई विद्यापीठ** येथील **लोककला अकादमीतील कार्ये व कर्तव्ये यांचा तपशील:**

**कार्यालयाचे नाव** : लोककला अकादमी

**पत्ता** : मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, तिसरा मजला, 'बी' रोड, चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

**दूरध्वनी** : ०२२ २२८७१७८८.

**कार्यालय प्रमुख** : डॉ. गणेश चंदनशिवे.

**शासकीय विभागाचे नाव** : मुंबई विद्यापीठ

**कोणत्या मंत्रालयातील** : उच्च व तंत्रशिक्षण विभाग, महाराष्ट्र शासन

**खात्याच्या अधिनस्त**

**कार्यक्षेत्र** : मुंबई विद्यापीठ, मुंबई

मुंबई, मुंबई-उपनगर, ठाणे, रत्नागिरी, सिंधुदुर्ग व पालघर जिल्हा

**विशिष्ट कार्य** :

१) विद्यार्थ्यांना प्रयोगात्म लोककलेचे सखोल ज्ञान मिळावे म्हणून लोककले संबंधित कार्यशाळा, चर्चासत्रे, व्याख्यांनांचे आयोजन करणे.

**विभागचे ध्येय** :

१) अस्थगंत होत जाणाऱ्या लोककलांचे जतन आणि संर्वधन व्हावे म्हणून संशोधनासाठी विद्यार्थ्यांना प्रवृत्त करणे.

**विभागाचे धोरण** :

१) १२ ऑगस्ट २००४ मध्ये स्थापन झालेल्या लोककला अकादमी विभागाचे धोरण विद्यार्थ्यांना लोककलेच्या शास्त्रशुध्द पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमा मार्फत प्रयोगात्म लोककलांचे प्रशिक्षण देणे हे विभागाचे मुख्य धोरण आहे.

२) लोककला अकादमीतर्फे प्रयोगात्म पदव्युत्तर पदविका, बारावी नंतरचा प्रमाणपत्र अभ्यासक्रम तसेच लोककलेतील पीएच. डी पदवी याबाबतीत सखोल ज्ञान देऊन लोककलेच्या अनुशंगाने सामाजिक, सांस्कृतिक बाजू उलघडून दाखविणे.

**सर्वसंबधित कर्मचारी** :

| **अ. क्र.** | **कर्मचाऱ्यांची नावे** | **पदनाम** |
|---|---|---|
| **शिक्षक कर्मचारी** | | |
| १. | डॉ. गणेश चंदनशिवे. | विभागप्रमुख (कायमस्वरूपी) |
| २. | डॉ. मोनिका ठक्कर | सहाय्यक प्राध्यापिका (हंगामी) |
| **शिक्षकेतर कर्मचारी** | | |
| **१** | श्री. कृष्णा मुसळे | वादक प्रशिक्षक (हंगामी) |
| **२** | श्री. विजय चव्हाण | ताल वाद्य प्रशिक्षक (हंगामी) |
| **३** | श्री. मदन दुबे | गायन प्रशिक्षक (हंगामी) |
| ४ | सौ. हेमाली शेडगे | नृत्य प्रशिक्षक (हंगामी) |
| **५** | श्री. योगेश चिकटगावकर | अभिनय प्रशिक्षक (हंगामी) |
| ६ | श्रीकांत केळकर | कनिष्ठ लिपिक ( कायमस्वरूपी) |
| ७. | जयेश जाधव | ध्वनी मुद्रक(हंगामी) |
| ८ | अंतरिक्ष खरात | संशोधन समन्वयक (हंगामी) |
| ९. | रसिका चव्हाण | कलावंत समन्वयक (हंगामी) |
| १०. | समीर डोंगरकर | वाद्य - कपडेपट हाताळणी (हंगामी) |
| ११. | दिपाली भोईर | लिपीक (हंगामी) |
| १२ | अभिजीत ढोकरे | शिपाई (हंगामी) |

**कार्य**: संशोधन कार्य करणे

**कामाचे विस्तृत स्वरूप**: महाराष्ट्रातील लोप पावत चाललेल्या लोककला प्रकाराचे संशोधन करणे, ग्रंथ प्रसिध्द करणे, ध्वनिचित्रण फिती तयार करणे

**मालमत्तेचा तपशील** :

**इमारती व जागेचा तपशील**: मुंबई विद्यापीठ, विद्यापीठ विद्यार्थी भवन, तिसरा मजला, 'बी' रोड,

चर्चगेट, मुंबई - ४०० ०२०.

दूरध्वनी : ०२२ २२८७१७८८.

**संस्थेच्या संरचनात्मक तक्त्यामध्ये कार्यक्षेत्राचे प्रत्येक स्तरावरचे तपशील :**

**कुलगुरू**

।

विभागप्रममुख

| शिक्षक कर्मचारी | शिक्षकेत्तर कर्मचारी |
|---|---|
| सहाय्यक प्राध्यापिका | कनिष्ठ टंकलिपीक (१) (कायमस्वरूपी) |
| वादक प्रशिक्षक | ध्वनी मुद्रक (१)(हंगामी) |
| ताल वाद्य प्रशिक्षक | संशोधन समन्वयक (१)(हंगामी) |
| गायन प्रशिक्षक | कलावंत समन्वयक (१) (हंगामी) |
| नृत्य प्रशिक्षक | कपडेपट- वाद्य हाताळणीस (१) (हंगामी) |
| अभिनय प्रशिक्षक | लिपीक (१)(हंगामी) |
| | शिपाई (१)(हंगामी) |

**कार्यालयीन दूरध्वनी क्रमांक व वेळा** : ०२२ २२८७१७८८.

सकळी १०. ३० ते ६. ००वाजेपर्यंत

जेवणाची वेळ - दुपारी १.०० ते १. ३०

**साप्ताहिक सुट्टी व विशिष्ट सेवेसाठी ठरविलेल्या वेळा**: सर्व रविवार व महिन्यातील दुसरा व चौथा शनिवार

## कलम ४ (१) (ब) (ii) नमुना (अ)

मुंबई विद्यापीठ येथील लोककला अकादमीतील कार्यालयातील अधिकारी व कर्मचारी यांच्या अधिकारांचा तपशील :

| | | | | अ |
|---|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **पदनाम** | **अधिकार- आर्थिक** | **कोणत्या कायद्या/नियम/शासननिर्णय/परिपत्रकानुसार** | **अभिप्राय** |
| **शिक्षक कर्मचारी** | | | | |
| १. | प्रध्यापक व विभागप्रमुख | विद्यापीठ अनुदानआयोग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ व मुंबई विद्यापीठ नियमांनुसार | विद्यापीठ अनुदान आयोग तसेच महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानांनुसार | -- |
| २ | सहाय्यक प्राध्यापिका | आर्थिक अधिकार नाहीत | ..... | |
| ३ | वादक प्रशिक्षक | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ४ | ताल वाद्य प्रशिक्षक | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ५ | गायन प्रशिक्षक | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ६ | नृत्य प्रशिक्षक | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ७ | अभिनय प्रशिक्षक | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| **शिक्षकेत्तर कर्मचारी** | | | | |
| **१** | कनिष्ठ टंकलिपीक (कायमस्वरूपी) | **अंशत: आर्थिक अधिकार** | | |
| २. | ध्वनी मुद्रक (हंगामी), | आर्थिक अधिकार नाहीत | -- | -- |
| ३. | संशोधन समन्वयक (हंगामी) | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ४. | कलावंत समन्वयक (हंगामी) | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ५ | कपडेपट- वाद्य हाताळणीस | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ६. | लिपीक (हंगामी) | आर्थिक अधिकार नाहीत | | |
| ७. | शिपाई (हंगामी) | आर्थिक अधिकार नाहीत | -- | -- |
| | | | | **ब** |

**ब**

| **अनु. क्र.** | **पदनाम** | **अधिकार – प्रशासकीय** | **कोणत्या कायद्या/नियम/शासननिर्णय/परिपत्रकानुसार** | **अभिप्राय** |
|---|---|---|---|---|
| **शिक्षक कर्मचारी** | | | | |
| १. | प्रध्यापक व विभागप्रमुख | विद्यापीठ अनुदानआयोग, महाराष्ट्र शासन, महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ व मुंबई विद्यापीठ नियमांनुसार | विद्यापीठ अनुदान आयोग तसेच महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानांनुसार | -- |
| २ | सहाय्यक प्राध्यापिका | प्रशासकीय अधिकार नाहीत | | |
| ३ | वादक प्रशिक्षक | प्रशासकीय अधिकार नाहीत | | |
| ४ | ताल वाद्य प्रशिक्षक | प्रशासकीय अधिकार नाहीत | | |
| ५ | गायन प्रशिक्षक | प्रशासकीय अधिकार नाहीत | | |
| ६ | नृत्य प्रशिक्षक | प्रशासकीय अधिकार नाहीत | | |
| ७ | अभिनय प्रशिक्षक | प्रशासकीय अधिकार नाहीत | | |
| **शिक्षकेत्तर कर्मचारी** | | | | |
| **१** | कनिष्ठ टंकलिपीक (कायमस्वरूपी) | **अंशत:** | | |
| २. | ध्वनी मुद्रक (हंगामी), | प्रशासकीय अधिकार नाहीत | -- | -- |
| ३. | संशोधन समन्वयक (हंगामी)) | प्रशासकीय अधिकार नाहीत | -- | -- |
| ४. | कलावंत समन्वयक (हंगामी) | प्रशासकीय अधिकार नाहीत | ---- | --- |
| ५ | कपडेपट- वाद्य हाताळणीस | प्रशासकीय अधिकार नाहीत | | |
| ६. | लिपीक (हंगामी) | प्रशासकीय अधिकार नाहीत | --- | --- |
| ७. | शिपाई (हंगामी) | प्रशासकीय अधिकार नाहीत | -- | -- |

## कलम ४ (१) (ब) (ii) नमुना (ब)

| | | | | |
|---|---|---|---|---|
| | | | | ब |
| अनु. क्र. | पदनाम | कर्तव्य - प्रशासकीय | कोणत्या कायद्या/नियम/शासननिर्णय/परिपत्रकानुसार | अभिप्राय |
| **शिक्षक कर्मचारी** | | | | |
| १. | विभागप्रमुख | १ लोककला अकादमीच्या सर्व प्रशासकीय कामकाजाची जबाबदारी<br>२ लोककला अकादमीच्या पाठयक्रम, परिक्षा आणि संशोधनत्मक कार्याची जबाबदारी<br>३ संशोधनाच्या संकलित माहीतीचे विश्लेषण आणि संशोधन जबाबदारी | विद्यापीठ अनुदान आयोग तसेच महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| २ | सहाय्यक प्राध्यापिका | १. लोककला अकादमीच्या पाठयक्रम, परिक्षा आणि संशोधनत्मक कार्याची जबाबदारी<br>२. संशोधनाच्या संकलित माहीतीचे विश्लेषण आणि संशोधन जबाबदारी | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| **शिक्षकेत्तर कर्मचारी** | | | | |
| ३ | वादक प्रशिक्षक (हंगामी) | १.विद्यार्थ्यांना ढोलकी, पखवाज,या लोकवाद्यांचे प्रशिक्षण देणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| ४ | ताल वाद्य प्रशिक्षक (हंगामी) | १. विद्यार्थ्यांना दिमडी, संबळ, ढोल आणि इतर लोकवाद्याचे प्रशिक्षण देणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | गायन प्रशिक्षक (हंगामी) | १. विद्यार्थ्याना प्रयोगात्मक लोककलांची गायकी तसेच शास्त्रशुद्ध लोकगायन पद्धतीचे प्रशिक्षण देणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| ६ | नृत्य प्रशिक्षक (हंगामी) | १. प्रयोगात्मक लोककलामधील लोकनृत्याचे प्रशिक्षण विद्यार्थ्याना देणे आणि सराव करून घेणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| ७ | अभिनय प्रशिक्षक (हंगामी) | १. प्रयोगात्मक लोककलामधील लोकअभिनयाचे प्रशिक्षण विद्यार्थ्याना देणे आणि सराव करून घेणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| १. | संशोधन समन्वयक | १ संशोधन समन्वयकाने गोळा केलेली माहिती व लोककलावंतांच्या ध्वनीचित्रमुद्रित मुलाखतींचे लेखन करणे<br>२ लोककला प्रकारानुसार डेटा तयार करणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| २ | ध्वनी मुद्रन समन्वयक | संशोधन दौऱ्यात संशोधना संबंधी मुलाखती आणि लोककलाप्रकाराचे चलचित्रिकरण आणि छायाचित्रण काढणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| ३ | कनिष्ठ टंकलिपीक (हंगामी) | १ विभागातील पत्रव्यवहारांची, नस्तीची नोंद करणे.<br>२ विभागात आलेल्या पत्रांची पोच देणे.<br>३ नवीन नस्ती तयार करणे आणि कारकुनी कामावर लक्ष ठेवणे<br>४ वेगवेगळ्याा नोंदपुस्तके तसेच नमुन्याचे छापील कागद ठेवणे.<br>५ योग्य कार्यवाहिसाठी आवश्यक असलेली उपयुक्त माहिती गोळा करणे.<br>६ दररोजच्या कामाची नोंद ठेवणे आणि आठवड्याच्या थकलेल्या कामाचा अभिप्राय वरिष्ठ अधिकाऱ्यांना देणे. | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| ४ | कलावंत समन्वयक | १ क्षेत्रीय संशोधनाचे दौरे ठरविणे<br>२. संबधीत लोककलावंतांशी संपर्क साधणे<br>३. संशोधन दौऱ्याचे नियोजन करणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| ५ | कपडेपट-वाद्य हाताळणीस | १. वाद्याची देखभाल करणे<br>२. वद्याची कार्यक्रम स्थळी ने आण करणे<br>३. कपडयांची देखभाल करणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| ६ | लिपिक | १. विभागातील पत्रव्यवहारांची नस्ती नोंद करणे<br>२. विभागातील आवक जावक पत्राची नोंद करणे | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |
| ७ | शिपाई (हंगामी) | १ विभागातील खिडक्याा उघडून देणे आणि पंखे चालू करणे व आवश्यक नसेल तेव्हा ते बंद करणे.<br>२ विभागातील साधनसामग्री, टेबल, यंत्रे, नस्ती यांची धूळ साफ करणे. तसेच यंत्रावरची कवर घालणे व काढणे<br>३ विभागात आलेल्या पत्रव्यवहार व परिपत्रके यांची विभागणी करुन ती योग्या त्या नस्ती मध्ये ठेवणे. ४ पोस्ट ऑफिसमध्ये जाऊन पत्रे देणे.<br>५ कार्यालयात तसेच बाहेर जसा प्रसंग असेल त्याप्रमाणे कागदपत्रे, नस्ती व पत्रे पोच करणे.<br>६ विभागातील वाहून नेण्याजोगे यंत्रे व नस्ती एका ठिकाणाहून दुसऱ्या ठिकाणी वाहून नेणे.<br>७ आवश्यकता असेल तेंव्हा कर्मचाऱ्यांना व बाहेरील पाहूण्यांना पाणी, चहा देणे.<br>८ विभागप्रमुखांच्या व वरिष्ठ अधिकाऱ्यांच्या मान्यतेने दिलेले इतर कामे करणे. | महाराष्ट्र शासन व मुंबई विद्यापीठ यांनी वेळोवेळी निर्गमित केलेल्या परिपत्रकानुसार | |

| | | क आणि ड | | |
|---|---|---|---|---|
| **अनु. क्र.** | **पदनाम** | **कर्तव्य - फौजदारी आणि अर्धन्यायिक** | **कोणत्याकायद्या/नियम/शासननिर्णय/परिपत्रकानुसार** | **अभिप्राय** |
| **शिक्षक कर्मचारी** | | | | |
| १. | विभागप्रमुख<br>सहाय्यक प्राध्यापक | महाराष्ट्र विद्यापीठ कायदा, १९९४ मध्ये फौजदारी कर्तव्यांचा स्पष्ट उल्लेख नाही | निरंक | -- |
| ३ | वादक प्रशिक्षक (हंगामी) | | | |
| ४ | ताल वाद्य प्रशिक्षक (हंगामी) | | | |
| ५ | गायन प्रशिक्षक (हंगामी) | | | |
| ६ | नृत्य प्रशिक्षक (हंगामी) | | | |
| ७ | अभिनय प्रशिक्षक (हंगामी) | | | |
| | | | | |
| **शिक्षकेत्तर कर्मचारी** | | | | |
| ३. | संशोधन समन्वयक(हंगामी) | -- | -- | -- |
| ४. | ध्वनी मुद्रक समन्वयक(हंगामी) | -- | -- | -- |
| ५. | कलावंत समन्वयक (हंगामी) | -- | -- | -- |
| ६. | कनिष्ठ टंकलिपीक (हंगामी) | महाराष्ट्र अकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालये प्रमाणसंहिता नियमावली १९८४ नुसार अर्धन्यायीक कर्तव्यांचा स्पष्ट उल्लेख नाही | -- | -- |
| ७. | कपडे पट हाताळणीस(हंगामी) | -- | -- | -- |
| ८. | शिपाई (हंगामी) | -- | -- | -- |

**कलम ४ (१) (ब) (iii)**

निर्णय प्रक्रियेतील पर्यवेक्षण व जबाबदारीचे उत्तरदाईत्व करून कार्यपद्धतीचे प्रकाशन :

कामाचे स्वरुप : पदविधर विद्यार्थ्यांना लोककलेच्या शास्त्रशुध्द पदव्युत्तर पदविका अभ्यासक्रमा मार्फत प्रयोगात्म लोककलांचे प्रशिक्षण देणे तसेच लोककलेच्या प्रमाणपत्र अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देणे.

अधिनियमाचे नाव : महाराष्ट्र प्रमाणसहिता नियमावली १९८४

नियम : महाराष्ट्र प्रमाणसहिता नियमावली १९८४ नुसार तसेच महाराष्ट्रशासन यांनी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकानुसार

शासन निर्णय : महाराष्ट्रशासन यांनी वेळोवेळी निर्गमीत केलेल्या परिपत्रकानुसार

कार्यालयीन आदेश : मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार

# कलम ४ (१) (ब) (पअ) नमुना (अ)

**नमुन्यामध्ये कामाचे प्रकटीकरण**

**संघटनांचे लक्ष (वार्षिक)**

| अनु. क्र. | **काम / कार्य** | **कामाचे प्रमाण** | **आर्थिक लक्ष** | **अभिप्राय** |
|---|---|---|---|---|
| | | **लागू नाही** | | |

# कलम ४ (१) (ब) (**iv**) नमुना (ब)

| अनु. क्र. | काम / कार्य | दिवस/तास पुर्ण करण्यासाठी | जबाबदार अधिकारी | तक्रार निवारण अधिकारी |
|---|---|---|---|---|
| | | | | |
| | | | | |
| | | | | |

**कलम ४ (१) (ब) (v) नमुना (अ)**

कामाशी संबंधित नियम, अधिनियम

| अनु. क्र | सुचना पत्रकानुसार दिलेले विषय | नियम क्रमांक व वर्षे | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्रअकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयाये प्रमाणसहिंता नियमावली १९८४ नुसार आलेले विषय | महाराष्ट्रअकृषी विद्यापीठे आणि संलग्न महाविद्यालयाये प्रमाणसहिंता नियमावली १९८४ नुसार | ---------- |

**कलम ४ (१) (ब) (v) नमुना (ब)**

कामाशी संबंधित शासननिर्णय

| अनु. क्र | शासनाच्या निर्णयानुसारदिलेले विषय | शासननिर्णय क्रमांक व तारीख | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्रशासनाच्या निर्णयानुसार आलेले विषय | महाराष्ट्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके | ---------- |

**कलम ४ (१) (ब) (v) नमुना (क)**

कामाशी संबंधित परिपत्रके

| अनु. क्र | शासनाच्या पत्रकानुसारदिलेले विषय | परिपत्रक क्रमांक व तारीख | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | महाराष्ट्रशासनाच्या परिपत्रकानुसार आलेले विषय | महाराष्ट्रशासनाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके | ---------- |

**कलम ४ (१) (ब) (v) नमुना (ड)**

कामाशी संबंधित कार्यालयीन आदेश/धोरणात्मक परिपत्रके

| अनु. क्र | शासनाच्या पत्रकानुसारदिलेले विषय | परिपत्रक क्रमांक व तारीख | अभिप्राय |
|---|---|---|---|
| १. | मुंबई विद्यापीठाच्या परिपत्रकानुसार आलेले विषय | मुंबई विद्यापीठाने वेळोवेळी निर्गमित केलेली परिपत्रके | ---------- |

**कलम ४ (१) (ब) (v) नमुना (इ)**

**मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमी उपलब्ध** दस्तऐवजांची यादी दस्तऐवजांचा विषय

| **अनु. क्र** | **दस्तऐवजाचा प्रकार** | **विषय** | **संबंधित व्यक्ती/ पदनाम** | **व्यक्तीचे ठिकाण/ उपरोक्त कार्यालयात उपलब्ध नसल्यास** |
|---|---|---|---|---|
| १ | नोंदपुस्तक | कर्मचाऱ्यांचे हजेरीपट | विभागप्रमुख | |
| २ | नोंदपुस्तक | कर्मचाऱ्यांची ये-जा नोंदवही | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ३ | नोंदपुस्तक | जावक नोंदवही | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ४ | नोंदपुस्तक | डेड स्टॉक रजिस्टर | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ५ | नोंदपुस्तक | स्टॉक रजिस्टर | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ६ | नोंदपुस्तक | हिस्ट्री रजिस्टर | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ७ | नोंदपुस्तक | पिटी कॅश रजिस्टर | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ८ | नस्ती | कार्यालयीन नस्ती | कनिष्ठ टंकलिपीक | |
| ९ | नोंदपुस्तक | ग्रंथालय पुस्तके नोंदवही | संशोधन समन्वयक | |
| १० | नोंदपुस्तक | ध्वनीचित्रमुद्रित केलेल्या मुलाखती लोककला प्रकारांच्या डी.व्ही कॅसेटची नोंदवही | ध्वनी मुद्रक समन्वयक | |

**कलम ४ (१) (अ) (vi)**

**मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमी** दस्तऐवजांची वर्गवारी

| अनु. क्र | विषय | दस्तऐवजाचा प्रकार/नस्ती/ मस्टर/नोंदपुस्तक/ इ. | प्रमुख बाबींचा तपशीलवार | सुरक्षित ठेवण्याचा कालावधी |
|---|---|---|---|---|
| १ | Vice-Chancellor | नस्ती | पत्रव्यवहार | १० वर्ष |
| २ | P.V.C | नस्ती | पत्रव्यवहार | १० वर्ष |
| ३ | Regisatar | नस्ती | पत्रव्यवहार | १० वर्ष |
| ४ | Admission | नस्ती | बिले | १० वर्ष |
| ५ | Advertising | नस्ती | पत्रव्यवहार | १० वर्ष |
| ६ | Adjunct faculty | नस्ती | बिले व पत्रव्यवहार | १० वर्ष |
| ७ | cicruler | नस्ती | बिले व परिपत्रके | १० वर्ष |
| ८ | Seminaras and workshops | नस्ती | बिले पत्रव्यवहार परिपत्रके | १० वर्ष |
| ९ | Account | नस्ती | बिले, परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्ष |
| १० | Festeval | नस्ती | बिले परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्ष |
| ११ | Satff Changes non teaching Satff | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्ष |
| १२ | Telephone | नस्ती | दूरध्वनी बिले आणि नोंद | १० वर्ष |
| १३ | G.A.D | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्ष |
| १४ | Stationary | नस्ती | परिपत्रके बिले | १० वर्ष |
| १५ | Ph.D Student | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्ष |

| | | | | |
|---|---|---|---|---|
| १६ | Certificate Student | नस्ती | प्रवेश अर्ज आणि पत्रव्यवहार | १० वर्षे |
| १७ | Examination | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्षे |
| १८ | Petty cash | नस्ती | पत्रव्यवहार | १० वर्षे |
| १९ | Purchase (Non Recurring) | नस्ती | बिले आणि आवर्तीखर्च | १० वर्षे |
| २० | Purchase (Recurring) | नस्ती | बिले आणि आवर्तीखर्च | १० वर्षे |
| २१ | Repairs & Maintenance | नस्ती | बिले | १० वर्षे |
| २२ | Scholarship | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्षे |
| २३ | Study Tour | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्षे |
| २४ | Budget | नस्ती | परिपत्रके आणि पत्रव्यवहार | १० वर्षे |

| कलम ४(१)(अ) **(vii)** |
|---|

**मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमी** परिणामकारक कामासाठी जनसामान्यांशी सल्लामसलत करण्याची व्यवस्था

| अनु. क्र | सल्ला मसलतीचा विषय | कार्यप्रणालीचे विस्तृत वर्णन | कोणत्या अधिनियम/परिपत्रकाद्वारे | पुनरावृत्तीकाल |
|---|---|---|---|---|
| लागू नाही | | | | |

| कलम ४(१)(अ) **(vii)** नमुना (अ) |
|---|

**मुंबई विद्यापीठातीला** लोककला अकादमी समितीची यादी प्रकाशित करणे

| अनु. क्र | समितीचे नाव | समितीचे सदस्य | समितीचे उद्दीष्ट | कितीवेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत उपलब्ध असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | सल्लागार समिती | १ माननीय कुलगुरू- अध्यक्ष<br>२ प्रकुलगुरू- सदस्य<br>३ बी.सी.यु.डी.- सदस्य<br>४वित्त व लेखाधिकारी- सदस्य<br>५प्रा. डॉ. गणेश चंदनशिवे- सदस्य विभागप्रमुख<br>सल्लागार समिती सदस्य<br>१. प्रा. राजीव मिश्रा<br>२. डॉ. उमा रेळे<br>३. डॉ. शाश्वती मंडल<br>४. नरसिंह चिटणीस | १. अभ्यासक्रमाची पुर्नरचना करणे<br>२. अभ्यासक्रमाचे तपशील ठरवणे<br>३. संदर्भ ग्रंथ ठरवणे<br>४. आर.आर. सी. बैठक आयोजित करणे. | वर्षातून २ वेळा | नाही | निरंक |

| कलम ४(१)(अ) ;अपपद्ध नमुना (ब) |
|---|

**मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीती**ल अधिसभांची यादी प्रकाशित करणे

| अनु. क्र | सभेचे नाव | सभेचे सदस्य | सभेच उद्दीष्ट | कितीवेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत उपलब्ध असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| लागू नाही | | | | | | |

## कलम ४(१)(अ) **(vii)** नमुना (क)

**मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीती**ल परिषदांची यादी प्रकाशित करणे

| **अनु. क्र** | परिषदेचे नाव | परिषदेचे सदस्य | परिषदेचे उद्दीष्ट | कितीवेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत उपलब्ध असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| लागू नाही | | | | | | |

## कलम ४(१)(अ) **(vii)** नमुना (ड)

**मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीत** कोणत्याही संस्थेची यादी प्रकाशित करणे

| **अनु. क्र** | संस्थेचे नाव | संस्थेच सदस्य | संस्थेचेउद्दीष्ट | कितीवेळा घेण्यात येते | सभा जनसामान्यांसाठी खुली आहे किंवा नाही | सभेचा कार्यवृत्तांत उपलब्ध असल्यास |
|---|---|---|---|---|---|---|
| लागू नाही | | | | | | |

**कलम ४ (१) (ब) (ix)**

**मुंबई विद्यापीठातील लोककला अकादमीती**ल अधिकारी व कर्मचारी यांची नावे भत्ते व त्यांचे मासिक वेतन

| **अनु. क्र** | पदनाम | अधिकारी/कर्मचाऱ्याचे नाव | वर्ग | रूजू दिनांक | दूरध्वनी क्रमांक | एकूण वेतन |
|---|---|---|---|---|---|---|
| १ | विभागप्रमुख | डॉ. गणेश चंदनशिवे | १ | १०/०१/२००६ | २२८७१७८८ ganesh.chandan20@gmail.com | १५६०० ते ३९१००/- |
| २ | सहाय्यक प्राध्यापिका **(हंगामी)** | डॉ. मोनिका ठक्कर | २ | १०/०६/२०१६ | २२८७१७८८ | ८००० - २७५-१३५०० |
| ३ | वादक प्रशिक्षक **(हंगामी)** | श्री. कृष्णा मुसळे | ३ | ०१/०१/२०१७ | २२८७१७८८ | २४००० रूपये ठोक मासिक वेतन |
| ४ | ताल वाद्य प्रशिक्षक **(हंगामी)** | श्री. विजय चव्हाण | ३ | ०१/०१/२०१७ | २२८७१७८८ | २४००० रूपये ठोक मासिक वेतन |
| ५ | गायन प्रशिक्षक **(हंगामी)** | श्री. मदन दुबे | ३ | ०१/०१/२०१७ | २२८७१७८८ | २४००० रूपये ठोक मासिक वेतन |
| ६ | नृत्य प्रशिक्षक **(हंगामी)** | सौ. हेमाली शेडगे | ३ | ०१/०१/२०१७ | २२८७१७८८ | २४००० रूपये ठोक मासिक वेतन |
| ७ | अभिनय प्रशिक्षक **(हंगामी)** | श्री. योगेश चिकटगावकर | ३ | ०१/०१/२०१७ | २२८७१७८८ | २४००० रूपये ठोक मासिक वेतन |
| ३ | अभिनय प्रशिक्षक **(हंगामी)** | **अंतरिक्ष खरात** | ३ | १२/०३/२०१४ (५वर्ष कालावधी करीता नियुक्ती) | २२८७१७८८ antarikshaoturkar@gmail.com | २२८००/- ठोक मासिक वेतन |
| ३ | ध्वनी मुद्रक समन्वयक(हंगामी) | श्री जयेश जाधव | ३ | १२/०३/२०१४ (५वर्ष कालावधी करीता नियुक्ती) | २२८७१७८८ jayeshjadhav938@gmail.com | २२८००/- ठोक मासिक वेतन |
| ४ | कलावंत समन्वयक (हंगामी) | रसिका चव्हाण | ३ | १२/०३/२०१४ (५वर्ष कालावधी करीता नियुक्ती) | २२८७१७८८ | २३७००/- ठोक मासिक वेतन |
| ५ | कनिष्ठ टंकलिपीक | **श्री. श्रीकांत केळकर** | ३ | १३/०५/२०१६ (लोककला | | ३०३८४/- मासिक वेतन |

| | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | | | | अकादमीत रूजू झाल्याची दिनांक) | | |
| ६ | लिपीक | **दिपाली भोईर** | ३ | ०४/०७/२०१६ | dipalibhoir 07@gmail.com | ९०००/- ठोक मासिक वेतन |
| ७ | कपडे पट हाताळणीस(हंगामी) | श्री समीर डोंगरकर | ४ | १२/०३/२०१४ (५वर्ष कालावधी करीता नियुक्ती) | २२८७१७८८ | ९०००/- ठोक मासिक वेतन |
| ८ | शिपाई (हंगामी) | अभिजीत ढोकरे | ४ | ०१/०५/२०१४ | २२८७१७८८ | ८०००/- ठोक मासिक वेतन |

## कलम ४ (१) (ब) (xi)

मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे मंजूर अंदाज

पत्रक व खर्चाचा तपशील यांची विस्तृत माहीती प्रकाशित करणे

- अंदाजपत्रकाच्या प्रतीचे प्रकाशन
- अनुदानाच्या वितरणाच्या प्रतीचे प्रकाशन

| अनु. क्र | अंदाजपत्रकीय शीर्षकाचे वर्णन | अनुदान | नियोजित वापर क्षेत्र व कामाचा तपशील | अधिक अनुदान अपेक्षित असल्यास रूपयात | अभिप्राय |
|---|---|---|---|---|---|
| वित्त व लेखा विभागाशी निगडीत | | | | | |

## कलम ४ (१) (ब) (xii) नमुना (अ)-लागू नाही

## कलम ४ (१) (ब) (xii) नमुना (ब)-लागू नाही

## कलम ४ (१) (ब) (xiii) -लागू नाही

**कलम ४ (१) (ब) (xiv)**

मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीतील_माहितीचे इलेक्ट्रॉनिक स्वरूपात साठवलेली माहिति प्रकाशित करणे चालू वर्षाकरिता

| **अनु. क्र** | **दस्तऐवजांचा प्रकार** | **विषय** | **कोणत्या इलेक्ट्रॉनिक नमुन्यात** | **माहीती मिळवण्याची पध्दत** | **जबाबदार व्यक्ती** |
|---|---|---|---|---|---|
| १ | पत्रव्यवहार | विभागाने केलेले सर्व पत्रव्यवहार | हार्डडिस्क | रितसर अर्ज | विभागप्रमुख |
| २ | वर्षवृत्त | विभागाचा चालू वर्षाचा वर्षवृत्त | हार्डडिस्क | रितसर अर्ज | विभागप्रमुख |
| ३ | सांख्यिकी माहीती | --------- | --------- | --------- | विभागप्रमुख |
| ४ | शोधनिबंध | विभागातील शोधनिबंध | हार्डडिस्क | रितसर अर्ज | विभागप्रमुख |
| ५ | इतर | विभगतील इतर दस्तऐवल अंदाजपत्रक इ. | हार्डडिस्क | रितसर अर्ज | विभागप्रमुख |

- टेप
- फिल्म
- सिडी
- फ्लॉपी
- इतर कोणत्याही स्वरूपात

**कलम ४ (१) (ब) (xv)**

मुंबई विद्यापीठाच्य लोककला अकादमीतील सुविधांचा तक्ता प्रकाशित करणे
उपलब्ध सुविधा

| | | | |
|---|---|---|---|
| • | भेटण्याच्या वेळे संदर्भात माहीती | : | स. १०.३० ते १.०० आणि दु. ४.३० ते ६.०० |
| • | वेबसाईट विषयी माहीती | : | http://mu.ac.in/portal/lok-kala-academy |
| • | कॉलसेंटर विषयी माहीती | : | दूरध्वनी चालिका व चौकशी |
| • | अभिलेख तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहीती | : | -------------- |
| • | कामाच्या तपासणीसाठी उपलब्ध सुविधांची माहीती | : | ------------ |
| • | नमुने मिळण्याबाबत उपलब्ध माहीती | : | -------------- |
| • | सूचना फलकांची माहीती | : | विभागत १ सूचना फलक असून त्यावर माहीती प्रकाशित केली जाते. |
| • | ग्रंथालय विषयी माहीती | : | विभागात लोककलेच्या, लोककसाहित्याच्या संशोधन कार्यासाठी लागणारी उपयुक्त पुस्तके उपलब्ध आहेत. |

**कलम ४ (१) (ब) (xvi)**

मुंबई विद्यापीठ येथील लोककला अकादमीच्या कार्यालयातील शासकिय माहीती अधिकारी/सहायक शासकीय माहीती अधिकारी/ अपिलीय प्राधिकारी तेथील लोक प्राधिकरीच्या कार्यक्षेत्रातील घटक यांची विस्तृत माहिति प्रकाशित करणे.

**अ. शासकीय माहीती अधिकारी**

| **अनु. क्र** | **शासकीय माहीती अधिकाऱ्याचे नाव** | **पदनाम** | **कार्यक्षेत्र** | **पत्ता / फोन** | **ई-मेल** | **अपिलीय अधिकारी** |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. गणेश चंदनशिवे | स्हाय्यक प्राध्यापक व विभागप्रमुख | लोककला अकादमी | लोककला अकादमी, ३ रा मजला विद्यापीठ विद्यार्थी भवन, पं शोभनाथ मिश्रा मार्ग(बी.रोड) चर्चगेट मुंबई-४०००२० दूरध्वनी-२२८५०३९० | ganesh.chandan20@gmail.com | डॉ. एम. ए. खान |

**ब. सहायक शासकीय माहीती अधिकारी**

| **अनु. क्र** | **शासकीय माहीती अधिकाऱ्याचे नाव** | **पदनाम** | **कार्यक्षेत्र** | **पत्ता / फोन** |
|---|---|---|---|---|
| १ | डॉ. गणेश चंदनशिवे | विभागप्रमुख | लोककला अकादमी | लोककला अकादमी, ३ रा मजला विद्यापीठ विद्यार्थी भवन, पं शोभनाथ मिश्रा मार्ग(बी. रोड) चर्चगेट मुंबई-४०००२० दूरध्वनी- २२८५०३९० |

क. अपिलीय अधिकारी:

| अनु. क्र | शासकीय माहीती अधिकाऱ्याचे नाव | पदनाम | कार्यक्षेत्र | पत्ता / फोन | ई-मेल | अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|---|---|
| १. | डॉ. एम. ए. खान | कुलसचिव | मंबई विद्यापीठ | मुंबई विद्यापीठ एम. जी. रोड, फोर्ट मुंबई-४०००३२ २२८७१७८८ | registrar@fort.mu.ac.in | समन्वयक, लिपीक |

| कलम ४ (१)(क)- लागू नाही |
| --- |

| कलम ४ (१)(ड)- लागू नाही |
| --- |

मुंबई विद्यापीठाची लोककला अकादमी आणि शाहीर अमरशेख अध्यासन २०१६-२०१७

विभाग प्रमुख - प्रां .डॉ . गणेश चंदनशिवे.

## प्रां .डॉ . गणेश चंदनशिवे.यांचे ऑक्सफर्ड विद्यापीठ , लंडन येथे शोध निबंध सादरीकरण

मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभाग प्रमुख - प्रां .डॉ . गणेश चंदनशिवे यांनी १८ मार्च २०१६ रोजी लंडन येथील ऑक्सफर्ड विद्यापीठात आयोजित केलेल्या आंतरराष्ट्रीय परिषदेत academic tool to implement life long learning stratergies in tribal communities या विषयावर शोधनिबंध सादर केला. जगभरातील अभ्यासक या परिषदेत सहभागी झाले होते.

## Indian institute of advance study , shimala ,

Indian institute of advance study , shimala आयोजित आंतरराष्ट्रीय परिषदेत मुंबई विद्यापीठाच्या लोककला अकादमीचे विभाग प्रमुख प्रां . डॉ . गणेशं चंदनशिवे आणि लोककला अकादमीचे प्राध्यापक आणि शाहिर अमरशेख अध्यासनाचे समन्वयक यांनी आपले शोधनिबंध सादर के ले . " rethinking myth in folk dramatic forms " हा या परिषदेचा विषय होता . या परिषदेत प्रां डॉ. गणेश चंदनशिवे यांनी "तमाशा मे मिथक : एक अनुशिलन " तर प्रां . डॉ प्रकाश खांडगे यांनी "myth of god khandoba in ritualistic folk play jagaran हे शोधनिबंध सादर केले

## “जागरण” या लोककला प्रकारावर प्रशिक्षण शिबिर

मुंबई विदयापीठाच्या लोककला अकादमीतील विदयार्थांचा जागरण हा लोककला प्रकार अभ्यासक्रमात असून लोककलावंत परसराम घुसळे यांचे दिनांक२२ आणि २३ ऑगस्ट २०१६ रोजी  दोन दिवसीय प्रशिक्षण शिबिर ठेवण्यात आले होते .या शिबिरात परसराम घुसळे यांनी विदयार्थांना जागरणाचे प्रात्याक्षिक करुन दाखविले.

## मुंबई विदयापीठाच्या लोककला अकादमीचा “दशावताराचा ” अभ्यास दौरा

दशावतार हा कोकणातील पारंपरिक लोककला प्रकार अकादमीच्या विदयार्थाचा अभ्यास विषय असल्याने १६,१७,१८ जानेवारी २०१६ रोजी कोकण येथील कुडाळ येथील पिंगुळी गावात विदयार्थाचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला.चित्रकथी आणि कळसुत्री बाहुल्यांचा खेळ या लोककला प्रकारांची प्रात्याक्षिक परशुराम गंगावणे यांनी विदयार्थांना दाखविले . आणि दशावतार हा कलाप्रकार विदयार्थांना दाखवण्यात आला.या अभ्यास दौरयाचे नेतृत्व विभाग प्रमुख डॉ गणेश चंदनशिवे यांनी केले.

## शाहिर अमरशेख जन्मशताब्दी समिती , बार्शी , सोलापुर

मुंबई विदयापीठाची लोककला अकादमी ,शाहिर अमरशेख अध्यासन आणि शां. अमरशेख जन्मशंताब्दी समिती , सोलापुर यांच्या संयुक्त विदयमाने शां अमरशेख यांच्या जन्मशताब्दी वर्षा निमित्त शांहीरी फुलोरा आणि राष्ट्रीय चर्चा सत्र या कार्यक्रमांचे आयोजन करण्यात आले होते.या कार्यक्रमात अकादमीचे विभाग प्रमुख डॉ . गणेश चंदनशिवे यांनी

समन्वयाचे काम पाहिले आणि आणि राष्ट्रीय चर्चासत्रात " संयुक्त महाराष्ट्राच्या लढयात शांहिरांचे योगदान " या विषयावर शोधनिबंध सादर केला .

## संत गोन्सालो गार्सिया कॉलेज , वसई

दिनांक २१ /१२/२०१६ रोजी संत गोन्सालो गार्सिया कॉलेज , वसई या कॉलेजमध्ये अकादमीचे विभांगप्रमुख डॉ गणेश चंदनशिवे यांना युवा महोत्सवासाठी प्रमुख अतिथी म्हणून बोलविण्यात आले होते.त्या ठिकाणी गोंधळ , भारुड आणि पोवाडा या विषयी विदयार्थांना सादरीकरणासहीत उद्‌बोधक मार्गदर्शन केले.

## सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठ , पुणे ,मराठी विभाग आयोजित राष्ट्रीय चर्चासत्र

सावित्रीबाई फुले पुणे विदयापीठाच्या मराठी विभागाने दिनांक ३ ,४ व ५ मार्च २०१६ रोजी " भारतीय लोकसाहित्य :संशोधनाच्या दिशा " या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजिय केले होते. या चर्चासत्रात अकादमीचे विभाग प्रमुख डॉ गणेश चंदनशिवे यांनी सहभागी होऊन शोधनिबंधं सादर के ला

## डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ , नाटयशास्त्र विभाग आयोजित राष्ट्रीय चर्चासत्र

डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठाच्या नाटयशास्त्र विभागा तर्फे दिनांक २१ व २२ नोव्हेंबर २०१६ रोजी Theatre : possibilities & challenges या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्र आयोजित केले होते. या चर्चासत्रात अकादमीचे विभाग प्रमुख डॉ गणेशं चंदनशिवे यांनी सक्रिय सहभाग घेवून शोधनिबंध सादर केला.

## New arts , commerce and science college , ahmednagar महाविदयालयात डॉ . गणेश चंदनशिंवे यांचे व्याख्यान .

New arts , commerce and science college , ahmednagar महाविदयालया तर्फे दिनांक २८ जानेवारी २०१६ रोजी " महाराष्ट्रीयन लोककला " या विषयावर चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात अकादमीचे विभाग प्रमुख डॉ . गणेश चंदनशिंवे यांना व्याख्याना बरोबर सादरीकरण सुध्दा केले.

## महाराष्ट्र शासनाच्या शासकीय विधी महाविदयालयात डॉ गणेश चंदनशिवे यांना परिक्षक म्हणून निमंत्रण

महाराष्ट्र शासनाच्या शासकीय विधी महाविदयालया तर्फे आयोजित केलेल्या युवा महोत्सवाचे परिक्षण  अकादमीचे विभाग प्रमुख डॉ गणेश चंदनशिवे यांनी केले आणि विदयार्थ्यांना उद्बोधक मार्गदर्शन ही केले.

## डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ , नृत्य  विभाग , औरंगाबाद  आयोजित राष्ट्रीय चर्चासत्र

डॉ .बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विदयापीठ , नृत्य  विभाग , औरंगाबाद  तर्फे दिनांक ०९ आणि १० डिसेंबर २०१६ रोजी connectivity & relativity of performing arts to Indian tradition & culture y या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात अकादमीचे विभागप्रमुख डॉ गणेशं चंदनशिवे यांनी सहभागी होवून शोधनिबंध सादर केला

## मुंबई विदयापीठाच्या हिन्दी विभागा तर्फे राष्ट्रीय चर्चासत्रात सहभाग

मुंबई विदयापीठाच्या हिन्दी विभागा तर्फे दिनांक २८ आणि २९ मार्च २०१६ रोजी "डॉ आंबेडकर की विचारधारा और वैश्विक साहित्य " या विषयावर दोन दिवसीय राष्ट्रीय चर्चा सत्राचे आयोजन करण्यात आले होते.या चर्चासत्रात अकादमीचे विभाग प्रमुख डॉ गणेशं चंदनशिंवे यांनी शोधनिबंध सादर केला

# Department of languages indira Gandhi (sr.) college , nanded

Department of languages indira Gandhi (sr.) college , nanded तर्फेदिनांक २८ ते ३० रोजी "लोकसाहित्य :वैश्विक परिदृश्य" या विषयावर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते. या चर्चासत्रात अकादमीचे विभाग प्रमुख डॉ गणेश चंदनशिवे यांनी सहभांग घेऊन " लोकनाटयातील रांगडी गंमत : तमाशां" हा शोधनिबंध सादर केला.

## मुंबई विदयापीठाच्या लोककला अकादमीचा "दशावताराचा "अभ्यास दौरा

लोककला अकादमीच्या विदयार्थांचा " दशावतार" हा लोककला प्रकार अभ्यासाचा विषंय असल्याने दिनांक १६ १७ १८ डिसेंबर २०१६ रोजी कोकणातील कुडाळ तालुक्यातील पिंगुळी गावात विदयार्थाचा अभ्यास दौरा आयोजित करण्यात आला होता.या अभ्यास दौयात दादा राणे यांच्या दशांवतारी कलावंतांच्या मार्गदर्शनाखाली दशावताराची कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती .दादा राणे यांनी विदयार्थांना दशावताराच ईतिहास समजवून सांगितला. या अभ्यास दौयाचे नेतृत्व विभाग प्रमुख डॉ गणेश चंदनशिवे आणि डॉ प्रकाश खांडगे तसेच सशोधन समन्वयक अंतरिक्ष खरात यांनी केले.

## भारुड प्रशिक्षण शिबिराचे आयोजन

मुंबई विदयापीठाच्या लोककला अकादमीच्या विदयार्थाचा भारुड हा लोककला प्रकार अभ्यासाचा विषय असल्याने दिनांक १७ आणि १८ जानेवारी २०१७ रोजी भारुडकार चंदाबाई तिवाडी यांचे भारुडावर प्रशिक्षण शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. चंदाबाई तिवाडींनी विदयार्थांना प्रशिक्षणा बरोबरच भारुडाचे सादरीकरण सुध्दा करुन दाखविले.

## प्रा, डॉ गणेश चंदनशिवे यांना " महाराष्ट्र लोकगौरव पुरस्कार" जाहिर

मुंबई विदयापीठाच्या लोककला अकादमीचे विभाग प्रमुख यांना महाराष्ट्र लोककलावंत प्रतिष्ठान तर्फे दिनांक २६ फेब्रुवारी २०१७ रोजी " महाराष्ट्र लोकगौरव पुरस्कार प्रधान कण्यात आला.या सोहळया निमित्त " महाराष्ट्र शांहिरी लोककला महोत्सव " चे आयोजन करण्यात आले होते. तसेच या महोत्सवामध्ये नामवंत शाहिर , नामवंत लोककलाकार , सिने व नाटय कलाकार मंडळी उपस्थित होते.

## तमाशा प्रशिक्षण शिबिर

मुंबई विदयापीठाच्या लोककला अकादमीत " तमाशां " हा लोककला प्रकार अभ्यासक्रमात असल्याने दिनांक २२ ते २४ ऑगस्ट २०१६ रोजी विदयार्थासाठी तमाशा प्रशिक्षण शिबिर आयोजित करण्यात आले होते . शांहिर आतांबर शिरढोणकर यांच्या मार्गदर्शनाखाली विदयार्थ्यासांठी पारंपरिक तमाशाची कार्यशांळा आयोजित करण्यात आली होती. आतांबर शिरढोणकरांनी विदयार्थ्यांना तमाशाचा ईतिहास समजुन सांगितला आणि तमाशाचे सादरीकरणकरण सुध्दा केले.

## पोवाडा कार्यशाळा

मुंबई विदयापीठाच्या लोककला अकादमीत " पोवाडा " हा लोककला प्रकार अभ्यासक्र मात असल्याने दिनांक २२ ते २३ डिसेंबर २०१६ रोजी विदयार्थ्यांसाठी पोवाडयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. शाहिर आदिनाथ विभूते यांच्या मार्गदर्शनाखाली या शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. शाहिर आदिनाथ विभूते यांनी पोवडयाची उत्पती आणि त्याचा ईतिहास विदयार्थ्यांना समजावून सांगितला आणि त्यांच्या क लापथकां बरोबर विदयार्थ्यांना पोवाडयाचे सादरीकरण करुन दाखविले.

## परंपरा महोत्सव आणि लोककथा गायनावर राष्ट्रीय परिषद

शाहिर अमरशेख यांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोपाचे औचित्य साधून मुंबई विदयापीठाची लोककला अकादमी आणि त्या अंतर्गत असणाया शाहिर अमरशेख अध्यासना तर्फे दिनांक १८ , १९ , २० ऑक्टोबर रोजी कवी कुसुमाग्रज मराठी भाषा भवन विदयानगरी परिसर , कलिना येथे परंपरा महोत्सव तसेच लोककथां गायनावर राष्ट्रीय परिषदेचे आयोजन करण्यात आले होते . ही परिषद इंडियन फोकलोअर कॉग्रेस यांच्या सहयोगाने घेण्यात आली होती .परिषदेचे उद्घांटन मंहाराष्ट्र शासनाचे प्रधान सचिव श्री भूंषण गगराणी यांच्या हस्ते झाले.प्रमख पाहुणे म्हणून ज्येष्ठ समिक्षक डॉ विजय तापस आणि ज्येष्ठ कवयित्री डॉ अरुणा ढेरे उपस्थित होते. इंडियन फोकलोअर कॉग्रेसंचे अध्यक्ष आंतरराष्ट्रीय कीर्तीचे अभ्यासक डॉ जवाहरलाल हांडू योचे बीजभाषण झाले . या परिषदेत भारत भरातून ५० अभ्यासकांनी सहभाग घेतला

शाहिर अमरशेखांच्या जन्मशताब्दी वर्ष समारोप समारंभाचे अध्यक्षस्थान मुंबई विदयापीठाचे कुलगुरु मा. डॉ संजय देशमुख यांनी भुंषविले.या वेळी प्रमुख पाहुणे म्हणून केंद्रीय सामाजिक न्याय मंत्री मा .श्री रामदासजी आठवले तसेच उच्च व तंत्र शिंक्षण राज्यमंत्री मा .श्री रवींद्र वायकर होते.डॉ जब्बार पटेल.कुलसचिव डॉ. एम. ए .खान , डॉ अनिल पाटील डांयरेक्टर बी.सी.यु.डी , पत्रकार राही भिडे आदि मान्यवरांची उपस्थिती होती.

## भक्ती समर्पण महोत्सव :अवघा रंग एकचि झाला

भारत सरकारच्या संगीत नाटक अकादमी तर्फे दिनांक ३० जानेवारी ते ३ फेब्रवारी २०१७ या कालावधीत पंढरपूर भक्ती समर्पण महोत्सवाचे आयोजन करण्यात आले होते.प्रख्यात संत त्यागराज यांच्या २५० व्या जयंती वर्षाचे औचित्य साधून हा महोत्सव आयोजित करण्यात आला होता.भक्ती संप्रदायातीलं नाटय या रुपाने रसिकांसमोर आले.या महोत्सवात भारतातील विविध भक्ति नाटय परंपरेचे दर्शन झाले.या भक्ती नाटय परंपरा कधी नृत्य नाटयं स्वरुपातल्या तर कधी कथां नाटयाच्या स्वरुपातल्या होत्या.मणीपुरचे नट संकीर्तण , बसंत रास , पुंग चोलम हे प्रकार नृत्य नाटयाच्या जवळचे होते. पुंग चोलम आणि ढोल चोलम या प्रकारांनी कृष्ण भक्तीचे नाटय उभें केले.या महोत्सवात छत्तीसगढची पंडवानी ही विशेष आकर्षणाचा विषय ठरली.सयप्पा बंडगर यांचे धनगरी गज ढोल नृत्य , राजन वैदय यांच्या पथकाचा पोवाडा , डॉ तुलसी बेहरे यांचा दशावतार असे अनेक कलाप्रकार या महोत्रसवात सादर झाले.राष्ट्रीय चर्चा सत्रात डॉ रामचंद्र देखणे, मुकुंद कुळे,ह.भ.प अशोक महाराज काळे, डॉ तारा भवाळकर , डॉ सिसिलिया कार्व्हालो, डॉ विदयासागर पाटांगणकर , राही भिडे, डॉ अरुणा ढेरे, प्रां डॉ गणेशं चंदनशिंवे,प्रां . डॉ प्रकाशं खांडगे .श्रीमती चंदाबाई तिवाडी आदींनी आपले विचार व्यक्त केले.

# मुंबई विदयापीठाचे शाहीर अमरशेख अध्यासन आणि लोककला अकादमी तर्फे लोकसाहित्य -लोककलांवर राष्ट्रीय चर्चासत्र

मराठी राजभाषादिनाच्या पार्श्वभूमीवर शनिवार दिनांक २५ फेब्रुवारी २०१७ रोजी मुंबई विदयापीठाचे शाहीर अमरशेख अध्यासन आणि लोककला अकादमी तर्फे शाहीर अमरशेख सभागृह , विदयार्थी भवन , बी रोड , चर्चगेट येथे लोकसाहित्य लोककलांवर राष्ट्रीय चर्चासत्राचे आयोजन करण्यात आले होते."लोककलांचे लौकिकीरण , जागतिकीकरण आणि लोककला" हा या चर्चासत्राचा विषय होता.तसेच महाराष्ट्रातील नामवंत लोककलावंतांचा " फुलोरा लोककलांचा" हा सांस्कृतिक कार्यक्रम देखील आयोजित करण्यात आला होता.

या चर्चासत्रात ज्येष्ठ कवयित्री डॉ अरुणा ढेरे , महाराष्ट्र शासनाच्या माहिती विभागाचे अध्यक्ष अजय अंबेकर , पत्रकार राही भिडे उपस्थितीत होते तर अध्यक्षस्थानी मुंबई विदयापीठाचे कुलसचिव डॉ . एम. ए .खान होते. चर्चासत्रात डॉ मधुकर वाकोडे , डॉ अनिल सहस्त्रबुध्दे , डॉ विश्वनाथ शिंदे , डॉ रुस्तूम अचलखांब , डॉ हरिश्चंद्र थोरात , संगीत दिग्दर्शक कौशल इनामदार , डॉ प्रविण भोळे , सुहास बहुलकर , डॉ भक्त वत्सल रेड्डी , डॉ गोविंद वर्माराजा ई मान्यवर उपस्थित होते.

समारोप सोहळयाला प्रख्यात पार्श्वगायिकां सुलोचना चव्हाण , ज्येष्ठ नाटय दिग्दर्शक कमलाकर सोनटक्के , ज्येष्ठ चित्रपट अभिनेते शिवाजी साटम उपस्थित होते. विशेष उपस्थिती म्हणून बी. सी . यु . डी अनिल पाटील आणि समारंभाचे अध्यक्ष म्हणून मुंबई विदयापीठाचे कु लगुरु मा. डॉ संजय देशमुख होते.